महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ५० वा दिनांक : १५/११/२०२४ वार : शुक्रवार

## मोदी युगाचा लवकरच अस्त होणार - शरद पवार



**मुंबई:** विधानसभा निवडणुकीमुळे अवघ्या महाराष्ट्राचे रान पेटले असताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युगाचा अस्त समिप आल्याचे भाकित वर्तवले आहे. विधानसभा निवडणुकीत भाजप व त्यांच्या मित्रपक्षांचा पराभव निश्चित आहे. त्यामुळे देशातील मोदी युगाचा अस्त लवकरच होईल, असे ते म्हणालेत.

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी एका हिंदी वृत्तपत्राला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी मोदी युगाच्या अस्ताची भाषा केली. ते म्हणाले, महाराष्ट्रात भाजप व त्यांच्या मित्र पक्षांचा पराभव जवळपास निश्चित आहे. निवडणुकीत त्यांचा पराभव झाल्यास हा संदेश संपूर्ण देशात जाईल. पंतप्रधान मोदी देशाचे सरकार चालवत आहेत, पण त्यांच्यावर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांची मदत घेण्याची वेळ आली आहे. हे दोन्ही नेते एकेकाळी त्यांच्या राजकीय धोरणांवर टीका करत होते हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

बिहारमध्ये विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची पहिली बैठक झाली होती. त्यात नितीशकुमार यांनी महत्त्वाची भूमिका घेतली होती. भाजपविरोधात एक भक्कम पर्याय उभा करण्याची गरज आहे का? यावर त्यांनी भाषण दिले होते. अशांना सोबत घेऊन मोदी आज राज्यशकट हाकत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास देशातील मोदी युगाचा अस्त होत असल्याचा संदेश देशात जाईल, असे पवार म्हणाले.

ते पुढे म्हणाले, राज्यात महाविकास आघाडीत नेमक्या किती जागा जिंकणार हे आज सांगता येणार नाही. पण लोकसभा निवडणुकीत आम्हाला ४८ पैकी ३१ जागा मिळाल्या. महायुतीला केवळ १७ जागा मिळाल्या. आजही लोकसभा निवडणुकीसारखेच अंडरकरंट महाराष्ट्रात आहे. येथील जनतेला परिवर्तन हवे आहे. पण महायुती त्याचा पैशाने सामना करण्याचा प्रयत्न करत आहे. त्याचा किती परिणाम होईल हे पहावे लागेल. पण माझ्या मते हा फार काही मोठा मुद्दा नाही.

याचे एक उदाहरण माझ्याकडे आहे. लोकसभा निवडणुकीत बारामतीत मध्यरात्री लोकांना पैशांचे वाटप झाले. त्यामुळे त्याचा फटका निवडणुकीत आम्हाला बसेल अशी काळजी वाटत होती. पण आम्हाला त्या भागात प्रचंड मतदान झाले. यावरून हे सिद्ध झाले की, लोकांनी पैसे घेतले असले तरी त्यांनी मतदान आपल्या मतानुसारच केले. हा समजूतदारपणा येथील लोकांमध्ये आहे. त्यामुळे जनता महाविकास आघाडीला संधी देईल असा मला ठाम विश्वास आहे.

शरद पवार यांनी या मुलाखतीत भाजपचा बटेंगे तो कटेंगे हा नारा ओबीसींना रोखण्यासाठी असल्याचाही आरोप केला. ते म्हणाले, नरेंद्र मोदी पंतप्रधान आहेत. त्यांनी समाजात फूट पाडण्यापासून स्वतःला दूर ठेवले पाहिजे. विरोधकांवर टीका करण्यात काहीही चुकीचे नाही. पण त्यांनी समाजात फुटीची भावना निर्माण होईल यापासून दूर राहिले पाहिजे. त्यांनी आपले राजकीय धोरण जनतेपुढे ठेवावे.

पंतप्रधानापदावर बसलेल्या व्यक्तीला समाजात विद्वेष पसरवण्याची भाषा शोभत नाही. पण मोदींनी ओबीसी समाज जागा झाल्यामुळे एक नवा ट्रेंड सुरू केला आहे. आपल्या हक्कांसाठी लढणाऱ्या ओबीसी समाजाला रोखण्यासाठी ते बटेंगे तो क्या होगा? अशी भाषा वापरत आहेत.

## राज्यात आघाडीचे सरकार येताच मोदींची सत्ता डगमगणार : संजय राऊत



**मुंबई** : भारतीय जनता पक्ष जाहिरातीवर तरलेला पक्ष आहे. जाहिरातीवरच पैसा खर्च करून २०१४ मध्ये नरेंद्र मोदी सत्तेवर आले आहेत. २०१४ मध्ये त्यांनी ब्लॅक अँड व्हाईट जाहिराती केल्या होत्या. आता दहा वर्षानंतरची परिस्थिती पाहिली तर नरेंद्र मोदी यांनी या देशांमध्ये फार मोठी क्रांती केलेली दिसत नाही. किंवा नवीन आधुनिक हिंदुस्तान घडवला असे कधीही दिसले नाही. किंबहुना आहे तो भारत देश सुद्धा त्यांनी मागे ओढला, असा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, नरसिंहराव, मनमोहन सिंग, राजीव गांधी अशा पंतप्रधानांच्या नेतृत्वात हा देश घडला. त्यामध्ये नरेंद्र मोदी यांनी काय केले? याची जर त्यांनी एकदा उजळणी आम्हाला करायला दिली तर बरे होईल. असे म्हणत संजय राऊत यांनी मोदींवर निशाणा साधला आहे. नरेंद्र मोदी शिवतीर्थावर सभा घेत आहेत. सध्या ते पंतप्रधान आहेत, त्यांनीच बसवलेले गुलामाचे सरकार महाराष्ट्रावर आहे. वास्तविक शिवतीर्थाला एक इतिहास आहे. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची समाधी देखील तेथेच आहे. त्या समाधीला स्मरुन मोदींनी सांगावे की, महाराष्ट्र तोडण्यासाठी, मुंबईचे महत्व कमी करण्यासाठी त्यांनी शिवसेना फोडली की नाही. हे त्यांनी छातीवर हात ठेवून सांगावे. त्यांच्यात जर तेवढी हिंमत असेल तर आम्ही पाहू असे म्हणत राऊत यांनी मोदींना आव्हान दिले आहे.

नरेंद्र मोदी एक तर ग्रामपंचायत पासून तर लोकसभेपर्यंत प्रचाराला असतात. किंवा विदेशात असतात, असे म्हणत संजय राऊत यांनी मोदींवर निशाणा साधला आहे. ते जागतिक दौऱ्यावर असतात, जगात फिरत असतात, त्यांच्या दौऱ्यावर जनतेचा विश्वास नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रातील जनता त्यांना भीक घालत नसल्यानेच ते महाराष्ट्रामध्ये पथारी पसरुन बसलेले असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. महाविकास आघाडीचेच राज्यामध्ये सरकार येत आहे. राज्यात आघाडीचे सरकार आल्यानंतर केंद्रातील नरेंद्र मोदी यांचे सरकार देखील डळमळीत होणार आहे. त्यामुळे अख्ख्या देशाचे लक्ष महाराष्ट्रावर लागले असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली या राज्यांमध्ये महाविकास आघाडीचे सरकार येत असल्याचे आम्हाला खात्री असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

गेले पंचवीस वर्षे राज ठाकरे हे रडतच आहेत. त्यांच्या रडण्याला आता राज्यातील जनता महत्व देत नाही. त्यामुळे त्यांच्याकडे फारसे गंभीरतेने पाहण्याची आवश्यकता नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. त्यांचा अभ्यास कमी आहे. त्यांचे वाचन कमी असल्याचे म्हणत संजय राऊत यांनी राज ठाकरे यांनाही प्रत्युत्तर दिले आहे.

नैतिक आणि अनैतिक या विषयावर योगी आदित्यनाथ यांनी बोलू नये. त्यांचे राज्य किती नैतिकतेवर काम करत आहे, हे तिथे जाऊन पाहायला हवे. त्यांच्या राज्यांमध्ये राम मंदिराच्या कामात भ्रष्टाचार झाला, राम मंदिरालाच गळती लागली, ते कोणत्या नैतिकतेच्या गोष्टी आम्हाला सांगत आहेत? असा प्रश्न संजय राऊत यांनी उपस्थित केला. या माध्यमातून संजय राऊत यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर देखील टीका केली आहे.

## कारखाने विकत घ्यायला आम्ही महाराष्ट्रभर हिंडलो नाही : जयंत पाटील



**सांगली** : खानापूर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार वैभव पाटील यांच्या प्रचारार्थ सभेत बोलताना जयंत पाटलांनी अजित पवारांवर टीका केली आहे. कारखाने विकत घ्यायला मी काही महाराष्ट्रभर हिंडलो नाही, असे म्हणत जयंत पाटलांनी अजित पवारांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. संभाजी पवारांचा कारखाना जयंत पाटलांनी विकत घेतला, असा आरोप अजित पवारांनी केला होता.

आष्टा येथील सभेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संभाजी पवारांचा कारखाना जयंत पाटलांनी विकत घेतला असा आरोप केला होता. यावर जयंत पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे. कारखाने विकत घ्यायला मी काही महाराष्ट्रभर हिंडलो नाही किंवा आमचे कारखाने बळकवण्याचीही भूमिका नाही. राजाराम बापू साखर कारखाना हा काय माझा खासगी कारखाना नाही. तर तो सहकारी साखर कारखाना आहे, असेही जयंत पाटील म्हणाले.

पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले, धुराडं पेटवणार म्हणजे काय? आम्ही साखर कारखाने सुरु व्हावेत ही आमची भूमिका आहे. साखर कारखाने बळकावण्याची आमची भूमिका नाही.

आष्टामध्ये एका नेत्याने सांगितले की संभाजी पवार यांचा कारखाना जयंत पाटील यांनी घेतला. संभाजी पाटील यांनी डोळ्यातून अश्रू काढले, हा कारखाना तुमच्याकडे घ्या म्हणाल्याचे जयंत पाटील म्हणाले. मी यावेळी बँकांना बोलावले, वन टाईम सेटलमेंट केले, ७० ७५ कोटी रुपये होते. राजारामबापू कारखान्याने ते पैसे भरले, त्यातून कारखाना सोडवल्याचे जयंत पाटील म्हणाले.

पुढे जयंत पाटलांनी सांगितले, पाच वर्ष आम्ही कारखाना चालवू, शेवटच्या दोन वर्षात त्यांनी पैसे द्यावेत आणि त्यांनी साखर कारखाना ही प्रक्रिया होती. ही प्रक्रिया त्यांनी केली नाही.

त्यामुळ राजारामबारू हा कारखाना माझा खासगी कारखाना नसल्याचे जयंत पाटील म्हणाले. आम्ही सहकारातील लोक आहोत. सहकाराशी प्रामाणिक राहू, असेही पाटील म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ नोव्हेंबर २०२४

## धर्म नव्हे तर देश धोक्यात : राजस्थानचे माजी मंत्री अमीन पठाण

**पुणे** : धर्म नव्हे तर देश धोक्यात आहे, कारण भाजप द्वेषाचे राजकारण करीत आहे, या द्वेषपूर्ण राजकारणाविरोधात महाराष्ट्राने कौल द्यावा', असे आवाहन आज राजस्थानचे माजी मंत्री आणि अजमेर शरीफ दर्गा समितीचे माजी अध्यक्ष अमीन पठाण यांनी केले. पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी हे आवाहन केले.यावेळी भारत जोडो अभियानाचे समन्वयक इब्राहिम खान,मराठी मुस्लिम सेवा संघचे पुणे शहराध्यक्ष जावेद शेख हे उपस्थित होते .

अमीन पठाण म्हणाले, भाजपच्या बऱ्याच योजना दहा वर्षात फसल्या आहेत. म्हणून 'मंगळसूत्र तोडले जाईल', 'जमिनी ताब्यात घेतल्या जातील', 'कटेंगे तो बटेंगे' वर उतरले आहेत. हा देश अनेकतेतून एकतेचे सौंदर्य मानणारा आहे. मात्र,सत्तेसाठी देशाला द्वेषाच्या खाईत लोटून देणे हाच अजेंडा आहे. संविधान बदलणे हाही अजेंडा आहे. त्या विरोधात देशाने लोकसभेत भाजपला योग्य संदेश दिला आहे. कोणताही धर्म धोक्यात नाही, तर देश धोक्यात आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास भाजपचे केंद्रातील सरकार लवकरच पडेल.

येणाऱ्या पिढ्यांना आपण काय देणार आहोत याचा विचार केला पाहिजे आणि महाविकास आघाडीला निवडून दिले पाहिजे', असे आवाहन अमीन पठाण यांनी केले. 'देशाला घाबरविण्याचे आणि दरी निर्माण करण्यासाठी स्फोटक वक्तव्ये सुरु आहेत. फक्त राहुल गांधी आणि सहयोगी पक्ष हे संविधान, प्रेम, रोजगार याबाबत बोलत आहेत. महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यस्था परिस्थिती बिघडली आहे. या सरकारने गुंडाना मोकळीक दिली आहे. त्यामुळे त्यांना सत्तेवर ठेवणे धोकादायक आहे, असेही त्यांनी सांगितले.

## मोदींनी उभ्या आयुष्यात संविधान वाचले नाही : म्हणून त्यांना माझ्या हातातील घटना कोरी वाटते - राहुल गांधी



**नंदुरबार** : संविधानात बुद्ध, गांधीजी, आंबेडकरांचे विचार यांचे विचार आहे. त्याला कोरं म्हणणे म्हणजे या सर्वांचा अपमान आहे, तो पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. आरएसएस आणि भाजपला संविधान मान्य नाही तर संविधान वाचविण्यासाठी आमची लढाई सुरू आहे, असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

राहुल गांधी म्हणाले की, देशातील जमीन, पाणी जगंलावर पहिला अधिकार हा आदिवासींचा आहे. त्यांना केवळ आदिवासी आहे म्हणून मागे ठेवले जाते. नोकऱ्या दिल्या जात नाही. वनवासी म्हणून त्यांचे सर्व अधिकार काढून घेतले जातात. पण संविधानात असा काही शब्दच नाही. नंदुरबार जिल्ह्यात चार विधानसभा मतदारसंघ आहेत आणि महाविकास आघाडीतर्फे चारही विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाला उमेदवारी देण्यात आली आहे. या सभेत बोलताना राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

राहुल गांधी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात माझ्या हातातील संविधान कोरं आहे. मोदींजी माझ्या हातातील संविधान कोरं नाही. तुम्ही या संविधानाला कोरं म्हणून, गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करतात. संविधानात तुम्हाला कुठेही वनवासी म्हटले जात नाही. यात तुम्हाला आदिवासी म्हटले जाते. म्हणजे देशाचे पहिले मालक.

राहुल गांधी म्हणाले की, वनवासी म्हणजे तुमचा कशावरच अधिकार नाही. जंगल कापून ती जमीन सरकार उद्योगपतींना देण्यात येते. तुमच्या मुलांना नोकरी दिली जात नाही. आदिवासींची संख्या ८ टक्के आहे तर त्यांना ८ भागीदारी मिळावी.

राहुल गांधी म्हणाले की, २५ लाख रुपयांचा विमा काढणार, २५ लाखांपर्यंत उपचार मोफत दिला जाणार. अडीच कोटी रोजगार दिले जाणार. पण जो पर्यंत युवकांना रोजगार दिले जाणार नाही तो पर्यंत त्यांना ४ हजार रुपये महिना दिला जाणार. वेदांता प्रकल्प सरकारने गुजरातला दिला, आम्ही ज्या त्या राज्याचे प्रकल्प त्यांच राज्यांना देणार. आदिवासी तरुणांना बाहेर जाऊन मजूर होण्याची गरज पडू देणार नाही.

राहुल गांधी म्हणाले की, आमचे सरकार आले तर शेतकऱ्यांना ३ लाख रुपयापर्यंत कर्ज माफी देणार असे आश्वासन राहुल गांधी यांनी सभेत दिले आहे. आरक्षणाची मर्यादा आम्ही ५० टक्क्यापेक्षा वाढवत आम्ही जातीय जणगणना करणार असे राहुल गांधींनी म्हटले आहे. आदिवासी आहात मागे रहा असे लोकांना सांगितले जाते, असा आरोप राहुल गांधी यांनी सरकारवर केला आहे. आदिवासी, दलित, मागसलेल्या लोकांना या सरकारने काही दिले नाही. मोदी जेवढे पैसे उद्योगपतींना देतील तेवढे पैसे आम्ही तुमच्या खात्यावर टाकू. आमचे सरकार महिलांना ३ हजार रुपये महिन्यांना देणार. तर एसटी सेवा महिलांना मोफत देणार असेही त्यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे.

राहुल गांधी म्हणाले की, आरएसएस आणि भाजप हे संविधान विरोधी आहेत म्हणून ते तुमच्या जमीनी उद्योजक आणि अरबपतीच्या नावावर करतात पण आम्ही तसे करणार नाही, संविधानाच्या रक्षणासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष 'बटेंगे तो कटेंगे'चे समर्थन करत नाही : अजित पवार



**बीड** : उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी बुधवारी पुन्हा एकदा आपला पक्ष 'बटेंगे तो कटेंगे' या भाजपच्या नाऱ्याचे समर्थन करत नसल्याचे स्पष्ट केले. महाराष्ट्र हा साधू संतांचा व शाहू, फुले, आंबेडकरांचा प्रदेश आहे. त्यामुळे येथे 'बटेंगे तो कटेंगे' असले काहीही चालणार नाही. आमच्यावर विश्वास ठेवा, आम्ही कुणाच्या केसालाही धक्का लागू देणार नाही, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांची बुधवारी बीडमध्ये प्रचारसभा झाली. या सभेत बोलताना त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा 'बटेंगे तो कटेंगे' या भूमिकेशी कोणताही संबंध नसल्याचे ठणकावून सांगितले. ते म्हणाले, कुणी काहीही बोलले तरी आम्ही त्याचे समर्थन करत नाही. महाराष्ट्रात 'बटेंगे तो कटेंगे' अजिबात चालणार नाही. ते तिकडे उत्तर भारतात चालेल. महाराष्ट्र हा साधू संतांचा प्रदेश आहे. शिवप्रेमींचा महाराष्ट्र आहे. शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. त्यांचीच शिकवण आमच्या रक्तात भिनलेली आहे. त्यामुळे आम्ही त्याच रस्त्याने पुढे जाणार

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाराष्ट्रात 'बटेंगे तो कटेंगे'ची हाक दिली आहे. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही 'एक है तो सेफ है'चा नारा दिला आहे. या दोन्ही नाऱ्यांमुळे महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघत असताना अजित पवारांनी त्यापासून स्वतःला व स्वतःच्या पक्षाला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

अजित पवार यांनी यावेळी अल्पसंख्याक समाजाला चुचकारण्याचाही प्रयत्न केला. लोकसभा निवडणुकीत अल्पसंख्याक समाजाने वेगळा निर्णय घेतला. त्यांनी महाविकास आघाडीला पाठिंबा दिला. पण असे करून त्यांनी काय मिळवले. शिवसेनेने वक्फ बोर्डाचा विषय आला तेव्हा सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. काय साध्य झाले? ज्यांना तुम्ही मते दिली तेच बहिष्कार टाकून गेले, याचा काहीतरी विचार करा ना. अल्पसंख्याक समाजाने आपल्या विचाराचे कोण आहेत, मदत करणारे कोण आहेत, वेळेवर धावून येणार कोण आहेत, बोलतात तसे वागणारे कोण आहेत याचा विचार करून मतदान केले पाहिजे, असे अजित पवार म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी संविधान बदलण्याची चुकीचा नरेटिव्ह पसरवला. आरक्षण रद्द करण्याची अफवा पसरवली. यामुळे मागासवर्गांची दिशाभूल झाली. अरे पण हे कुणी सांगितले? विरोधकांकडे दुसरा कोणताही मुद्दा नव्हता. त्यामुळे त्यांनी मनात येईल ते बेछूट आरोप केले. कुणी संविधान बदलले? आम्ही न्यायदेवेच्या डोळ्यांवरील पट्टी काढून तिच्या हातात तराजू व संविधान दिले. एवढा संविधानाचा आदर आम्ही करतो. हे चाललंय आमचे.

संविधानाने जम्मू काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आपल्या सर्वांना एकसंध ठेवले आहे. त्यामुळे आपल्या इथे पाकिस्तान व बांगलादेशासारखे उठाव होत नाहीत. जे युक्रेन व रशियात सुरू आहे तसेही आपल्याकडे घडत नाही. शेवटी आपली एक परंपरा आहे. आपली एक संस्कृती आहे. आपल्याला एक इतिहास आहे. या सर्वांचा विसर तुम्ही पडू देऊ नका, असे अजित पवार म्हणाले.

## सुप्रिया सुळेंनी सभा रद्द करून गाठले पोलिस आयुक्तालय

**नाशिक** : विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असतानाच नाशकात महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जोरदार राडा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. भाजप आणि शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली असून वाहने फोडल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे. याप्रकरणी सुप्रिया सुळे यांनी आक्रमक भूमिका घेत थेट पोलिस आयुक्तालय गाठले. महायुती आणि महाविकास आघाडीचे कार्यकर्ते भिडल्याने तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे.

नाशिक पूर्व मतदारसंघात आज भारतीय जनता पक्षाचे उमेदवार राहुल ढिकले यांच्या प्रचारार्थ रॅली सुरू होती. पंचवटी पोलिस ठाण्याच्या हद्दीत रॅलीत शरद पवार गटाचे उमेदवार गणेश गीते मविआचे कार्यकर्त्यांकडून पैसे वाटत होत असल्याचे भाजप कार्यकर्त्यांना समजले. त्यानंतर राहुल ढिकले यांचे कार्यकर्ते तेथे पोहोचले. यानंतर दोन्ही उमेदवारांचे कार्यकर्ते आमनेसामने आले. त्यांच्यात जोरदार बाचाबाची होऊन दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आरोप केले.

भाजपच्या कार्यकर्त्यांनी गणेश गीते यांच्या कार्यकर्त्यांकडून पैशांचे वाटप होत आहे, असा आरोप केला. तर भाजपच्या कार्यकर्त्यांनी आमच्यावर हल्ला केला, आमच्या गाड्या फोडल्या, असा आरोप गणेश गीतेंच्या कार्यकर्त्यांनी केला. आता हे प्रकरण पोलिसांपर्यंत गेले असून मविआचे सर्व उमेदवार पोलीस आयुक्तालयाच्या दिशेने रवाना झाले.

दरम्यान, राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे आज नाशिक दौऱ्यावर आहेत. घटनेची माहिती मिळताच त्या आपली सभा रद्द करून नाशिक पोलिस आयुक्तालयाच्या दिसून रवाना झाल्या. ही खूप चिंताजनक बाब आहे. हे अतिशय गलिच्छ राजकारण सुरु आहे. आमच्या कुटुंबातील माणसांवर असे हल्ले होणार असतील, तर आम्ही खपवून घेणार नाही. पोलिस प्रशासन काय करत आहे? अशी संतप्त प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.

दरम्यान, नाशिक पूर्वेत भाजपचे विद्यमान आमदार राहुल ढिकले, मनसेचे प्रसाद सानप आणि राष्ट्रवादी शपचे गणेश गिते अशी तिरंगी लढत होत आहे. गणेश गिते आधी भाजपमध्ये होते. त्यांची विधानसभा निवडणूक लढण्याची इच्छा होती. पण भाजपने त्यांना उमेदवारी दिली नाही. त्यामुळे गणेश गिते यांनी तुतारी हाती घेत उमेदवारी मिळवली. भाजपने आपल्या विरोधात डमी उमेदवार दिला, असा आरोप गणेश गितेंनी आधी केला होता. त्यानंतर आज गणेश गितेंच्या कार्यकर्त्यांकडून पैशांचे वाटप होत असल्याचा आरोप राहुल ढिकले यांच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

## 'LOVE YOU RAGA'पोस्टर घेऊन गर्दीत उभी होती तरुणी : राहुल गांधींनी गाडी थांबवत घेतली भेट

**दुरबार** : विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांची आज नंदुरबार येथे सभा पार पडली. तत्पूर्वी राहुल गांधी जाणार असणाऱ्या मार्गावर त्यांना पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. या गर्दीत राहुल गांधी यांची चाहती प्रियंका गावित हिने सर्वांचे लक्ष वेधले. प्रियंका गावित हातात 'LOVE YOU RAGA'असे पोस्टर घेऊन राहुल गांधीची वाट पाहत होती. प्रियंका गावितला पाहताच राहुल गांधी यांनी गाडी थांबवून तिची भेट घेत फोटो देखील काढला. राहुल गांधीनी भेट घेतल्यामुळे प्रियंकाचा आनंद गगनात मावला नाही.

प्रियंका गावित हिने राहुल गांधींना आतापर्यंत चार वेळा भेटली आहे. यापूर्वी राहुल गांधी यांनी काढलेल्या भारत जोडो यात्रेदरम्यान त्यांनी तिची भेट घेतली होती. प्रियंका राहुल गांधीची मोठी चाहती आहे. राहुल गांधी महाराष्ट्रात आल्यानंतर ती त्यांना भेटण्याची एकही संधी सोडत नाही.

आजही नंदुरबार येथे राहुल गांधी सभेसाठी येणार असल्यामुळे ती तिथे आली होती. राहुल गांधी जाणाऱ्या मार्गावर हातात पोस्टर घेऊन ती वाट पाहत उभी होती. राहुल गांधीचा ताफा दिसताच तिने त्यांना हात दिला. यानंतर राहुल गांधी यांनीही तिला पाहिल्यानंतर आपली गाडी थांबवून जवळ बोलावले. तिची भेट घेत तिच्यासोबत फोटो देखील काढला.

राहुल गांधी मला व्यक्तीगत खुप आवडतात. मागील वेळी भारत जोडो यात्रेला आल्यानंतर मी त्यांच्यासोबत सेल्फी घेतली होती. आताही मी उभी असताना त्यांनी मला पाहून गाडी थांबवून मला भेटण्यासाठी बोलावले. आता मी परत त्यांच्यासोबत फोटो काढला. माझा आनंद मी शब्दांत व्यक्त करू शकत नाही, अशी प्रतिक्रिया प्रियंका गावीत हिने दिली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ नोव्हेंबर २०२४


## जोपर्यंत शिवसैनिक आहेत, तोपर्यंत शिवसेना प्रमुख आहे : उद्धव ठाकरे



**छत्रपती संभाजीनगर :** येथे शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, मागच्या वेळेस लोकसभेला आलो होतो तेव्हा देखील अशीच गर्दी होती. मात्र तेव्हा पराभव झाला. काही प्रश्न मी तुम्हाला विचारतो, जे सरकार माझ्या नेतृत्वात अडीच वर्ष होतं ते तुम्हाला आवडले नव्हते का? म्हणून आपला पराभव झाला का? माझे नेतृत्व मान्य नाहीये का? मला मोदी आणि शहा घरी नाही बसवू शकत. तुम्ही जेव्हा सांगाल तेव्हा मी घरी बसेल. तुमच्यासाठी प्राण गेला तरी बेहत्तर लढून जिंकून दाखवेल.

उद्धव ठाकरे म्हणाले, शिवसेना प्रमुखांनी मला सांगितले, जोपर्यंत तुम्ही शिवसैनिक आहात तोपर्यंत मी शिवसेना प्रमुख आहे. माझ्या हातात काही नाही, तरी देखील तुम्ही मोठ्या संख्येने आलात हेच माझ्यासाठी खुप आहे. मला तुम्हाला काही तरी द्यायचे आहे. ती देण्याची ताकद जोपर्यंत तुम्ही माझ्या हातात देत नाहीत तोपर्यंत त्याला काही अर्थ नाही. कोणाच्या हातात मशाल आहे, कोण हात घेऊन उभा आहे तर कुठे तुतारी फुंकणारा मावळा आहे. आम्ही का लढत आहोत? महाराष्ट्राचा स्वाभिमान आणि अस्मिता ही पायदळी तुडवली जात आहे, त्याचे रक्षण करण्यासाठी आम्ही लढत आहोत.

आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा इथे झाली. या शहराचे नाव छत्रपती संभाजीनगर आम्ही केले, त्या मिंधेचे कौतुक केले. तुम्हाला सांगतो, जेव्हा तुम्ही ४० आमदार घेऊन गुवाहाटीला गेले होते, त्यावेळेला मी मंत्रालयात बसून या जिल्ह्याचे नाव छत्रपती संभाजीनगर करून दाखवले. जर ते म्हणत असतील की याचे नामकरण त्यांनी केले, तर मग त्यांनी सांगावे की संभाजीनगर कुठे आले? लोकसभा मतदारसंघ औरंगाबाद आहे. ज्या तत्परतेने तुमचा नोकर निवडणूक आयोगाने माझे पक्ष आणि चिन्ह चोरून तुम्हाला दिले, त्या तत्परतेने तुमचा नोकर निवडणूक आयोगाने या जिल्ह्याचे नाव छत्रपती संभाजीनगर का नाही केले? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

बाळासाहेबांचे स्वप्न या दाढीवाल्याने पूर्ण केले असे तुम्ही म्हणता, मग नवाज शरीफच्या वाढदिवसचा केक खाण्याचे स्वप्न तुमचे होते का? मी मुख्यमंत्री असताना आणि आपलं महाविकास आघाडी सरकार असताना याच संभाजीनगर मध्ये मेडिकल डिवाइस पार्क आणत होतो. कुठे गेला तो मेडिकल डिवाइस पार्क? गुजरात. तुम्हाला कल्पना आहे इथे जर मेडिकल डिवाइस पार्क आले असते तर किती रोजगार निर्माण झाला असता. जसं बजाज आल्यानंतर अनेकांना रोजगार मिळाले. तसेच मेडिकल डिवाइस पार्क जेव्हा मी छत्रपती संभाजीनगर मध्ये आणत होतो तो जर इथे आला असता तर माझ्या मराठवाड्यातल्या किमान एक लाख तरुणांना त्यातून रोजगार मिळाला असता.

## ईव्हीएम मध्ये गडबड, मला एकाचा सतत फोन येतोय : सुप्रिया सुळे



**नाशिक :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मतदान यंत्रात गडबड करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला आहे. एक व्यक्ती मला सतत फोन करून ईव्हीएम अर्थात मतदान यंत्रात गडबड झाल्याचे सांगत आहे. मी ही गोष्ट निवडणूक आयोगाच्या कानावर घालणार आहे, असे त्या म्हणाल्यात. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या अटकळींना पेव फुटले आहे.

सुप्रिया सुळे बुधवारी येथे बोलताना म्हणाल्या, मला सातत्याने एक व्यक्ती फोन करत आहे. त्यात तो ईव्हीएममध्ये गडबड करण्यात आल्याचा दावा करत आहे. माझा या गोष्टींवर विश्वास नाही. पण खबरदारी म्हणून मी ही माहिती निवडणूक आयोगाच्या कानावर घालणार आहे. कारण, कोणत्याही पक्षाच्या उमेदवाराची फसवणूक होऊ नये अशी माझी प्रेमळ भावना आहे. मी यासंबंधी कुणावरही आरोप करत नाही. पण असे फोन येतात तेव्हा काळजी वाटते. सत्तेत असो किंवा विरोधात कारभार पारदर्शक झाला पाहिजे असे माझे मत आहे.

सुप्रिया सुळे यांनी यावेळी आपला लढा कुटुंबासाठी नव्हे तर महाराष्ट्रासाठी असल्याचेही यावेळी ठणकावून सांगितले. अजित पवारांना कुटुंबातील कटुता संपणार नाही असे वाटते. हे त्यांचे मत आहे. लोकशाहीत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. पण ही लढाई कुटुंबाची नाही तर वैचारिक आहे. महाराष्ट्रावर होणाऱ्या अन्यायाविरोधातील ही लढाई आहे. मी माझ्या कुटुंबासाठी नव्हे तर महाराष्ट्रासाठी लढते आहे.

मायबाप जनतेसाठी संघर्ष करत आहे. महागाई, बेरोजगारी व भ्रष्टाचाराविरोधात लढत आहे. याचा कुटुंबाशी काय संबंध? आम्ही राजकारणात आमच्या कुटुंबासाठी आलो नाही. आम्ही राजकारणात राज्यातल्या मायबाप जनतेसाठी आलो आहोत, असेही सुप्रिया सुळे यावेळी बोलताना म्हणाल्या.

सुप्रिया सुळे यांनी यावेळी अजित पवारांनी भाजपसोबत जाण्याच्या बैठकीला उद्योगपती अदानी उपस्थित असल्याच्या मुद्यावरून घेतलेल्या युटर्नवरही निशाणा साधला. अजित पवारांनी भाजपसोबत जाण्याच्या मुद्यावर झालेल्या बैठकीला उद्योगपती गौतम अदानी उपस्थित असल्याचा दावा केला होता. याविषयी तुम्ही त्यांनाच विचारले पाहिजे. मी यापूर्वीच मला या भेटीची कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले आहे. पण आता त्यांनीच आपल्या वक्तव्यावरून युटर्न घेतला आहे, असे त्या म्हणाल्या.

## स्वतंत्र १० टक्के आरक्षण टिकणार नाही:कोणाचेही सरकार आले तरी सामूहिक उपोषण करणार, मनोज जरांगेंचा निर्धार



**आंतरवली सराटी :** कोणाचेही सरकार आले तरी सामूहिक आंदोलन करणार, असा निर्धार मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. आम्हाला १० टक्के आरक्षण नकोय, कारण स्वतंत्र दिलेले १० टक्के आरक्षण टिकणार नाही, असा दावा मनोज जरांगे यांनी केला. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी विधानसभा निवडणुका झाल्यानंतर आम्ही सामूहिक उपोषण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मनोज जरांगे यांचा आम्हाला पाठिंबा असल्याचे संभाजीराजे छत्रपती गेवराईतील सभेत म्हणाले होते. यावर बोलताना मनोज जरांगे यांनी राजगादीचा मी पहिल्यापासून सन्मान करत आलोय. पण मी राज्यात अपक्ष, पक्ष किंवा एखाद्या उमेदवाराला कुणालाही पाठिंबा दिलेला नाही, असे स्पष्ट केले. मला मराठा समाजाची आरक्षणाची लढाई लढायची आहे आणि ती मला महत्त्वाची आहे, असेही जरांगे म्हणाले.

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, आम्ही १० टक्के आरक्षण मागितलेच नाही, असे म्हणत अजित पवार यांना सुनावले. हे १० टक्के टिकणारच नाही. १३ टक्के आरक्षण जसे रद्द झाले, तसे हे १० टक्के आरक्षण देखील रद्द होईल. त्यानंतर पुन्हा मराठ्यांच्या पोरांचे हाल होतील. त्यामुळे आम्हाला हक्काचे आरक्षण हवे आहे आणि आम्ही हक्काचे आरक्षण मिळवणार, असा निर्धार जरांगे यांनी केला.

मराठा समाजाच्या निवडणुकीतील निर्णयावर बोलताना जरांगे म्हणाले, मराठा समाजाचा निर्णय झालेला आहे. लोकसभेला मी मराठा समाजाला सांगितले होते, ज्याला पाडायचे त्याला पाडा आणि ज्याला निवडून आणायचे त्याला निवडून आणा. मराठा हा बुद्धिजीवी समाज आहे. त्यांना ताबडतोब ते लक्षात आले. लोक आम्हाला वेड्यात काढतात. मराठे एकमेकांच ऐकत नाहीत. एकत्र येत नाहीत. मराठ्यांना गोड बोललो की, मराठे फसतात. परंतु मराठ्यांनी दाखवून दिले की, कुणाचेही नाव न घेता मराठा समाज त्यांना धुळीस मिळवू शकतो, असे मनोज जरांगे म्हणाले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ नोव्हेंबर २०२४

## चिखलठाण : धनुष्यबाणासाठी भाजप कार्यकर्ते मैदानात




**कन्नड (अरूण थोरात) :** महायुतीचा धर्म निष्ठेने पाळत, शिवसेना उमेदवार संजनाताई जाधव यांना निवडून आणण्याचा चंग बांधला भाजप नेत्यांसह कार्यकर्ते ही जमिनीवर उतरुण प्रचाराचा धुराळा उडवित आहे.कार्यकत्यांनी तालुक्यातील चिखलठाण, वडाळी, जैतखेडा, साळेगाव तांडा, हातनुर येथे बेठका घेऊन महायुती उमेदवार संजनाताई जाधव यांना मतदान करण्याचे आवाहन केले, महायुती सरकारने महिला, तरुण, जेष्ठ नागरिक, शेतकरी यांच्या साठी राबविलेल्या कल्याणकारी योजना ची माहिती देत. केंद्रात भाजप सरकार असल्याने राज्यात ही पुन्हा महयुती चे सरकार आणणे गरजेचे आहे. सरकार कडून तालुक्या ला भरघोस निधी पदरात पाडून घेण्यासाठी आपला आमदार हा महायुतीचा निवडूण आणावे लागेल असे अवाहन करत प्रचार सभा घेत परिसर पिंजून काढला.

यावेळी भाजप चे प्रवासी नेते महेंद्रजी वैष्णव, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष डॉ. बाळासाहेब जाधव, तालुका सरचिटणीस कैलास जाधव, किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष शिवप्रभु ज्ञाने, तालुका उपाध्यक्ष समीर बिडवई, बापु चव्हाण, संतोष बिडवे, श्रीराम वेताळ, सत्यवान वैष्णव, रविंद्र गवळी, रोहित वैष्णव, संदिप गवळी, विकास जाधव, बाळासाहेब वेताळ, उमेश, मच्छिंद्र भोसले, पवन देशमुख, सुधिर वेताळ आदी उपस्थित होते.

## हतनूर च्या चिमुरड्या बालसह्याद्री शंभू गिरी ने सर केला भैरवगड





**कन्नड (अरूण थोरात):** हतनूर ता. कन्नड येथील शंभु पवन गिरी (वय ६ वर्ष) व शिवांश गिरी (वय १० वर्ष) या दोन्ही भावंडांनी महाराष्ट्रातील सर्वात खडतर असलेला मोरोशीचा भैरवगड हा किल्ला न थकता सर केला आहे.शंभु गिरी चे वडील डॉ पवन गिरी हे सह्याद्री प्रतिष्ठान या दुर्गप्रेमी संघटनेचे राज्य संघटक आहेत. तसेच एक उत्तम गिर्यारोहक म्हणून ही प्रसिद्ध आहेत. त्यांनी महाराष्ट्रातील जवळपास दिडशे हून अधिक गडकिल्ले सर केले आहेत. त्यांच्या तांत्रिक मार्गदर्शनात शंभु व शिवाशं ही भावंडे अत्यंत कमी वयात ही ते छ.संभाजीनगर जिल्ह्यातील गडकिल्ल्यां वरील दुर्ग संवर्धन मोहिमांत सहभागी होत असत.

भैरवगड सारखा खडतर किल्ला सर करण्याची त्यांची ही पहिलीच वेळ असल्याने त्यांच्या या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या सोबत डॉ पवन गिरी, महेश भिंगारे, किशोर खंडागळे, अविनाश ठेंगडे आदी दुर्गप्रेमी सहभागी झाले होते. त्यांच्या या कामगीरी बद्दल सह्याद्री प्रतिष्ठान चे शिवराज पाटील, धैर्यशील केरे, अमोल भिंगारे, विष्णू भिंगारे, जगदिश कंचार, दिनेश दाभाडे, आकाश बारगळ, प्रविण दाभाडे, दादासाहेब पोकळे, अरुण थोरात, अंकुश थोरात, आदी दुर्गप्रेमींनी अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्रात भैरवगड नावाचे भैरवगड - कोथळे अहमदनगर जिल्हा, भैरवगड - शिरपुंजे अहमदनगर जिल्हा, भैरवगड - मोरोशी ठाणे/पालघर जिल्हा, भैरवगड - पाटणजवळ सातारा जिल्हा, भैरवगड/ बहिरवगड - पाथरपुंज कोयनानगर जवळ सातारा जिल्हा, भैरवगड - नरडवे सिंधुदुर्ग जिल्हा, भैरवगड - वारी अकोला जिल्हा हे सात किल्ले आहेत. गिरी भावंडांनी सर केलेला मोरोशी चा भैरवगड हा खडतर किल्ला गिरीदुर्ग या प्रकारातील असून तो पालघर, ठाणे जिल्ह्यात आहे.

इतिहास कालखंडात किल्लयाच्या माथ्या वरुन माळशेज घाट व नाणेघाट यावर लक्ष ठेवण्यासाठी याची निर्मिती करण्यात आली. वरतून दक्षिणे कडील नाणेघाट परीसर, पुर्वेकडील माळशेज घाट परिसर, उत्तरेकडील हरिश्चंद्रगड तारामती शिखर व बालेकिल्ला सहज पाहता येत. विशेष करून पश्चिमेस कल्याणमार्गावर होणा-या हालचालींवर प्रकाशझोत टाकण्यास सोपे जात.

## विधानसभा निवडणुकीत शालेय विद्यार्थ्यांची चंगळ, सलग ४ दिवस मिळणार सुट्ट्या?

**मुंबई :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १८, १९ आणि २० नोव्हेंबरला अनेक शिक्षक निवडणूक कर्तव्यावर असल्याने अनेक शाळांना बंद ठेवावे लागण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने याबाबत शाळांना सूचना पाठवल्या आहेत. शाळा बंद ठेवण्याचा निर्णय संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना घ्यायचा आहे. त्यामुळे या तीन दिवसांच्या सुट्टीचा शालेय विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. रविवारही यात समाविष्ट असल्याने विद्यार्थ्यांना एकूण चार दिवसांची सुट्टी मिळणार आहे.

राज्यभरात महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचं वातावरण आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. तर दुसरीकडे येत्या २० नोव्हेंबरला मतदान असल्याने प्रशासन कामाला लागलं आहे. विधानसभा निवडणुकीच्या कामात मोठ्या संख्येने शिक्षक निवडणूक ड्युटीवर अहेत. त्यामुळे अनेक शाळांना १८, १९ आणि २० नोव्हेंबरला शाळा चालविणे अशक्य आहे. त्यामुळे राज्य सरकारने याबाबत शाळांना विनंती पत्र पाठवलं आहे. ज्या शाळांना शाळा भरवणे कठीण आहे त्या शाळांना सुट्टी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्या सचिवांकडून सर्व शाळांना तसं विनंती पत्र पाठवण्यात आलं आहे. पण शाळेला सुट्टी देण्याबाबतचा निर्णय त्या त्या शाळेला घ्यायचा आहे. अर्थात ज्या शाळांकडून सुट्टी जाहीर केली जाणार त्या शाळेच्या विद्यार्थ्यांना १८,१९ आणि २० नोव्हेंबरची सुट्टी तर मिळणारच यासोबत १७ नोव्हेंबरला रविवार असल्याने सलग चार सुट्ट्यांचा आनंद शालेय विद्यार्थ्यांना घेता येणार आहे.निवडणूक कर्तव्यावर अनेक शिक्षक असल्यामुळे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शाळा या तीन दिवस भरवणे कठीण जात आहे. शिवाय मतदान केंद्र सुद्धा अनेक शाळाच आहेत. या सगळ्याचा विचार करून १८, १९ आणि २० नोव्हेंबर या तीन दिवशी ज्या शाळांना शाळा सुरु ठेवणं शक्य नसेल त्या शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. "१८, १९,२० नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीत शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यांमुळे ज्या ठिकाणी शाळा भरवणे शक्य नसेल त्या ठिकाणी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना शाळा बंद ठेवण्याबाबत निर्णय घेण्याबाबत सूचना द्या", असं विनंती पत्र राज्य सरकारच्या शिक्षण आयुक्तांनी सर्व शाळांना पाठवलं आहे.शिक्षण आयुक्तांनी विनंती पत्रात नेमकं काय म्हटलं आहे?

"उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक १८,१९ व २० नोव्हेंबर, २०२४ रोजी शाळांना सुट्टी जाहीर करण्याबाबतचा प्रस्ताव आपण शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ राज्यात सुरळीतपणे पार पाडण्यासाठी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे ज्या ठिकाणी शाळा भरवणे शक्य नसेल, त्या ठिकाणी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबतचा निर्णय घेणेबाबत आपण आपल्यास्तरावरून आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात, ही विनंती", असं शिक्षण आयुक्तांनी पत्रात म्हटलं आहे.

## बाल दिन साजरा

**हिंगोली :** स्पर्श शैक्षणिक व सामाजिक संस्था आजेगाव तर्फे पं. जवाहरलाल नेहरु यांच्या जयंती निमित्त पं. नेहरुंच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. बालदिनानिमित्त मुलांना फराळाचे वाटप करुन वृक्षारोपन केले.

यावेळी संस्थेच्या सचिव पल्लवी चाटसे, रिना चाटसे, ज्योती मोरे, रुपाली तायडे आदींची उपस्थिती होती.


